# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## ब-प्रभाग कार्यालय, चिंचवड, पुणे – ४११ ०३३.

**Email – bward@pcmcindia.gov.in  Website – www.pcmcindia.gov.in**


---

**जावक क्र. - बप्र/२/कावि/४३०/२०१३** **दिनांक ७/२/२०१३**

प्रति,
मा. श्री/श्रीमती ---------------------------
सदस्य/सदस्या, प्रभाग क्र.----------------
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

**विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि.---/२/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. --/०२/२०१३ रोजी दु. १२.०० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

कळावे,

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी, सभा शाखा,
ब प्रभाग समिती
चिंचवड ४११ ०३३.

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती सभा
## कार्यपत्रिका क्र. ९

दिनांक :--/०२/२०१३. वेळ : दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक --/२/२०१३. रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

मागील सभेचा सभावृत्तांत ( माहे जानेवारी २०१३ ) वाचून कायम करणे, विषयपत्रिकेवर चर्चा करणे. तसेच ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणे व त्यावर चर्चा करणे.

विषय क्र.१ विभाग:पाणी पुरवठा विभाग, ब प्रभाग

पुनावळे येथील तलाठी ऑफीस शेजारी शाळेच्या आवारातील जुनी पाण्याची टाकी पाडणेबाबत.

पुनावळे गांव मनपामध्ये सन १९९७ मध्ये समाविष्ट झालेले आहे. त्यावेळी पुनावळे गावातील पाणीपुरवठा बोअरवेलव्दारे करणेत येत होता. त्यापैकी पुनावळे येथील प्राथमिक शाळेजवळील बोअरवेलवर विद्‌युत पंप बसवून जमिनीवर दगडी बांधकामाने बांधलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये पाण्याचा साठा करुन त्यामधून काढलेल्या सार्वजनिक नळामधून पाणी पुरवठा करणेत येत होता. JNNURM अंतर्गत स.नं. १२ पुनावळे येथे १.५ द.ल.लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधून त्यामार्फत पाणी पुरवठा चालु करणेत आला असून सद्‌यस्थितीत त्या दगडी टाकीचा वापर होत नाही. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची दि.१६/०१/२०१३ रोजी पुनावळे येथील स्थानिक नगरसदस्य यांचे समवेत या भागातील पाहणी करताना सदर शाळेच्या प्रांगणामध्ये सदर वापरात नसलेली टाकी पाडून शाळेसाठी ग्राउंड करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर टाकी पाडणेचा कालावधी १ महिनेचा देणेत आलेला आहे. यासाठी सदरचा प्रस्ताव मा. ब प्रभाग समितीपुढे मंजूर होणे आवश्यक आहे

तरी सदर विषय प्रशासकिय मान्यता मिळणेकामी मा. ब प्रभाग समिती सभेपुढे ठेवण्यात यावा.

विषय क्र.२ विभाग: लेखा विभाग, ब प्रभाग

सन २०१२-२०१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-२०१४ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता घेणेबाबत.

ब प्रभाग कार्यालयाचे सन २०१२-२०१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास BPMC ACT 1949 चे कलम २९ (अ) मधील पोट कलम (७) चे पोटकलम (ब) नुसार मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदरचा विषय मा. प्रभाग समितीपुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा.

प्रशासन अधिकारी,(सभाशाखा)
ब प्रभाग समिती
चिंचवड ४११ ०३३

सर्व संबंधित शाखा प्रमुख.